◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

NEED24 NEWS
हर ख़बर, हर शहर

नीड 24 न्यूज़

हर खबर, हर शहर

◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

DIGITAL E-PAPER

PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577

GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT

UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714

◆ DIGITAL NEWS NETWORK ◆
भारताचे विश्वासार्ह बहुभाषिक डिजिटल न्यूज नेटवर्क
11+ Languages | 24×7 Live | e-Paper Daily

आमचे App डाउनलोड करा
Download on the App Store
GET IT ON Google Play

www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता

MAHARASHTRA | नीड 24 न्यूज़ · हर खबर, हर शहर | 14 नवम्बर 2026

राजनीति

आदित्य ठाकरे यांची पुणे दौऱ्यातील पत्रकार परिषद



१३ नोव्हेंबर २०२६ रोजी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते व आमदार आदित्य ठाकरे यांनी पुणे दौऱ्याचा भाग म्हणून पत्रकार परिषद घेतली.

चाकण MIDC आणि विकास कामे: चाकण एमआयडीसीसाठी जाहीर केलेल्या ₹१,४०० कोटींच्या पायाभूत सुविधा पॅकेजच्या अंमलबजावणीवर त्यांनी प्रश्न उपस्थित केले. रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, कचरा व्यवस्थापन व पाणी-वीज समस्या अद्याप सुटल्या नसल्याचे ते म्हणाले.

परिषदेत त्यांनी पक्षाच्या स्थानिक कार्यवाही व आगामी उपक्रमांबद्दल माहिती दिली. परिषदेनंतर उपस्थित पत्रकारांनी प्रश्न विचारले आणि आदित्य ठाकरे यांनी त्यांना उत्तर दिले.

— Ramesh Sukhdev Khandagale, पुणे

धर्म

हजरत गडबधी पीर शाह यांचा सँडल शरीफ आज दरगाहमध्ये प्रदर्शित



हजरत गडबधी पीर शाह यांचा सँडल शरीफ आज दरगाहमध्ये विशेष कार्यक्रमाच्या अंतर्गत प्रदर्शित करण्यात आला. हा कार्यक्रम स्थानिक भक्तांसाठी अत्यंत महत्त्वाचा होता आणि दरगाह परिसरात मोठी गर्दी दिसून आली.


कार्यक्रमाचे आयोजन दरगाहच्या अध्यक्ष फरोझ खान, उपाध्यक्ष शेख शरफू आणि सचिव शेख फरीद सलीम यांनी शांती आणि सौहार्दाच्या वातावरणात केले. त्यांनी उपस्थित लोकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, प्रार्थना आणि धार्मिक प्रवचनांचे नियोजन केले, ज्यामुळे कार्यक्रमात उत्सवाची भावना वाढली.

सँडल शरीफच्या प्रदर्शनाला स्थानिक समुदायाने मोठ्या आदराने स्वीकारले आणि भक्तांनी त्याच्या आध्यात्मिक महत्त्वाबद्दल विचार व्यक्त केले. हा प्रसंग दरगाहच्या धार्मिक वारशाला बळकटी देणाऱ्या महत्त्वाच्या घटनांपैकी एक मानला जाईल.

— Shaikh Taufeeq Sheikh Rafeeque, औरंगाबाद

कृषि

ओतूर बाजारात भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात आवक, भावात घसरण



जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ओतूर उपबाजारावर भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने बाजार भावात घसरण झाली. प्रति १० किलो प्रमाणे बाजार भाव पुढीलप्रमाणे आहेत:

फुल १० ते ५०, कोबी १० ते ३०, फरशी २०० ते ४००, घेवडा २०० ते ५००, गवार २०० ते ७५०, राजमा ३०० ते ८००, वाटाणा ३०० ते ११५०, वांगी ३० ते ७५, शिमला मिर्च १०० ते ४००, बीट ३० ते १५०, तोंडली २०० ते ४००, दोडका १०० ते २०० इत्यादी. ही माहिती ओतूर कार्यालयाच्या वतीने देण्यात आली.

— Ashok durgude, पुणे

मनोरंजन

१३/११/२०२६ रोजी वेलतूर येथे दिवाळी निमित्त राष्ट्रीय सिंगल तमाशा 'खडा व गंमत' साजरा



आज १३/११/२०२६ शुक्रवारी बाजार चौक येथे लोकशाहीर यूट्यूब चॅनेलद्वारे प्रसारित होणारा राष्ट्रीय सिंगल खडा तमाशा आणि गंमत, दिवाळीच्या खास पर्वाने आणि दरवर्षी प्रमाणे मंडई निमित्ताने यावर्षीही साजरा करण्यात आला. तसेच गट ग्रामपंचायत वेलतूर-बोथली यांच्या वतीने या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी जिल्हाध्यक्ष औद्योगिक महासंघ मा. श्री. डॉ. के. एम. तितरमारे, गट ग्रामपंचायत वेलतूरचे सरपंच सुशीलभाऊ रामटेके, उपसरपंच सुनीलभाऊ किंदर्ले, ग्रामसेवक भिमटे साहेब, सुधीरची बेले साहेब, धारगावे साहेब, बंडुजी बावणे (ग्रामपंचायत वेलतूर सदस्य), जयदेवजी चाचेरकर, उद्धवजी चाचेरकर आणि गुरुदेवजी पराते यांचे स्वागत करण्यात आले. तसेच ग्रामपंचायतचे कर्मचारी, मानवाईक मान्यवर आणि समस्त ग्रामवासी उपस्थित होते.

— Harshal Turandas Titarmare, नागपुर

देश

समृद्धी महामार्गावर दुसर बीडजवळ १९ गाड्यांचा भीषण अपघात



समृद्धी महामार्गावर १९ गाड्यांच्या धडकामुळे भीषण अपघात घडला. या धडकामुळे रस्त्यावर मोठा अडथळा निर्माण झाला.


ही घटना दुसर बीडजवळ घडली, जिथे अनेक वाहने एकमेकांना धडकली. धडकलेल्या गाड्यांची संख्या आणि स्थानिक परिस्थितीबद्दल अधिक तपशील उपलब्ध होत आहेत.

संबंधित अधिकाऱ्यांनी अपघाताची तपासणी सुरू केली आहे आणि रस्त्याची स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील.

— Raju Chhagan Giri

स्थानीय

समृद्धी महामार्गावर हिवरखेडच्या राहिरी पुलावर 26 गाड्यांचा भीषण अपघात, प्रतिनिधी प्रविण पाटील यांची उपस्थिती



आज समृद्धी महामार्गावर हिवरखेड येथील राहिरी पुलावर 26 गाड्यांचा भीषण अपघात घडला. हा अपघात अचानक घडला आणि सर्व गाड्यांचे गंभीर नुकसान झाले.

अपघातात अनेक गाड्या एकत्र धडकल्या, ज्यामुळे दोन्ही बाजूंची वाहने पूर्णपणे नष्ट झाली. रस्त्यावरील ट्रॅफिक तात्पुरते थांबवण्यात आले. सर्व रुग्णांची स्थिती स्थिर असल्याचे सांगितले गेले.

नाशिक येवला प्रतिनिधी प्रविण पाटील यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीची माहिती घेतली आणि रुग्णालयातील उपचारांची देखरेख केली.

— प्रविण भाऊसाहेब पाटील, नासिक

राजनीति

एक आमदार काय करू शकतो? याचं उत्तम उदाहरण म्हणजे अमरीश पटेल!



एक आमदार काय करू शकतो? याचं उत्तम उदाहरण म्हणजे अमरीश पटेल!

अमरीश पटेल १९९०-२००९ काळात काँग्रेसकडून ४ वेळा आमदार होते. ते महाराष्ट्राचे शिक्षणमंत्रीही होते. २०१९ वेळी त्यांनी भाजपात प्रवेश केला.आता गेली ४ टर्म ते विधानपरिषद आमदार आहेत कारण त्यांचा मतदारसंघ आदिवासी प्रवर्गासाठी राखीव झाला. अमरीश पटेल यांच्या मतदारसंघात गुजराती पटेल लोकांचं एकच घर असूनही पटेल अभूतपूर्व मताधिक्याने निवडून येतात. त्याचं कारण जलसंधारण आणि शिक्षणक्षेत्रातील कामामुळे!

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्याचे आमदार अमरीश पटेल यांनी शिरपूर पॅटर्न नावाचा लहान लहान बंधारे बनवून पूर्ण तालुका जलमय केला.या आमदारांनी शेतकऱ्यांकडून १ रुपया न घेता जवळपास ४७५ बंधारे बनवले आहेत आणि १२-१५ बंधाऱ्याचे काम चालूच आहे.प्रत्येक बंधाऱ्यात हा ५०० मीटर लांब आणि २० मीटर रुंदीचे माती काढण्याचे काम करून त्यात नद्यांचे किंवा पावसाचे वाहून जाणारे पाणी साठवले जाते.

जखमी झालेल्या प्रवाशांना त्वरित रुग्णालयात नेले गेले. सर्व रुग्णांची स्थिती स्थिर असल्याचे सांगितले गेले.

नाशिक येवला प्रतिनिधी प्रविण पाटील यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीची माहिती घेतली आणि रुग्णालयातील उपचारांची देखरेख केली.

— प्रविण भाऊसाहेब पाटील, नासिक

नद्यांवर बंधारे बनवण्याचे जेही सरकारी टेंडर निघतात त्यांची कामे १०-१५ टक्क्यांनी कमीने घेऊन अमरीश पटेल त्यांच्याकडेच असलेल्या यंत्रणेच्या माध्यमातून पूर्णत्वास नेतात. त्यांचं काम हे टॉप क्लास असतं. सरकारच्या पैशातूनच हि कामे त्यांनी केली आहेत पण त्यांनी सरकारी पैशांचा वापर पुरेपूर केला आहे.

शिरपूरमधील शेतकरी एका वर्षात तीन पिके घेतात.या बंधाऱ्यामुळे आजही दुष्काळात सगळ्या विहिरी पाणीदार आहेत.तिथे फळबागा हिरव्यागार आहेत. शिरपूर शहराला दररोज ५ तास पाणीपुरवठा केला जातो.प्रत्येक घरात वॉटर मीटर बसवलेले आहे.

शिरपूर हा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेवर असलेल्या आदिवासीबहुल तालुक्यात ५ एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न ७-८ लाखांच्या घरात आहे. दरवर्षी १५ आदिवासी मुलांना अमरीश पटेल डॉक्टर बनवतात. आजपर्यंत त्यातून ८० आदिवासी मुले डॉक्टर झालीत. त्यांनी आपल्या मतदारसंघात मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल उभारलेले आहे.

अमरीश पटेल आपले स्वतःचे काही पैसे, त्यानंतर SVKM कडून ४-५ कोटी CSR फंड आणि त्यांच्या मुलीकडून ४-५ कोटी घेऊन हि बंधाऱ्यांची कामे करतात.ते स्वतः SVKM शिक्षण विषयात काम करणाऱ्या ट्रस्टचे अध्यक्ष आहेत

अमरीश पटेल यांच्या मते शेतकरी स्वतः या पॅटर्नमध्ये सहभागी होत नाहीत.त्यासाठी शेतकरी प्रोक्लेन आणि ट्रॅक्टरच्या वापरासाठी आग्रही असतात.लोकसहभागाच्या चळवळी जलसंधारणात टिकाऊ काम आजपर्यंत का करू शकल्या नाहीत याची हि स्पष्टोक्ती आहे.

महाराष्ट्र सरकारने याच आधारावर जलयुक्त शिवार योजना आणली पण या योजनेचा अप्रोच गुत्तेदार केंद्रित असल्याने ती योजना आताच्या महाराष्ट्राच्या दुष्काळात कामाला आलेली नाही.कारण या दुष्काळात अजून तरी जलयुक्त शिवार योजनेतून पाणीदार झालेल्या गावांच्या केस स्टडीज बाहेर आल्या नाहीत. अधिकाऱ्यांच्या टक्केवारी खाण्यामुळेही आणि २०१४ नंतर चांगला पाऊस पडल्याने हि योजना संपुष्टात आली.

या जलयुक्त शिवारच्या कामाचे जेही फोटो येतात ते पावसाळ्यात पाऊस पडल्यानंतरचे येतात पण उन्हाळ्यात यातले किती पाणी टिकते किंवा त्या भागातील विहिरींना,

अमरीश पटेल यांनी शिरपूर पॅटर्न नावाचा लहान लहान बंधारे बनवून पूर्ण तालुका जलमय केला.या आमदारांनी शेतकऱ्यांकडून १ रुपया न घेता जवळपास ४७५ बंधारे बनवले आहेत आणि १२-१५ बंधाऱ्याचे काम चालूच आहे.प्रत्येक बंधाऱ्यात हा ५०० मीटर लांब आणि २० मीटर रुंदीचे माती काढण्याचे काम करून त्यात नद्यांचे किंवा पावसाचे वाहून जाणारे पाणी साठवले जाते.

नद्यांवर बंधारे बनवण्याचे जेही सरकारी टेंडर निघतात त्यांची कामे १०-१५ टक्क्यांनी कमीने घेऊन अमरीश पटेल त्यांच्याकडेच असलेल्या यंत्रणेच्या माध्यमातून पूर्णत्वास नेतात. त्यांचं काम हे टॉप क्लास असतं. सरकारच्या पैशातूनच हि कामे त्यांनी केली आहेत पण त्यांनी सरकारी पैशांचा वापर पुरेपूर केला आहे.

शिरपूरमधील शेतकरी एका वर्षात तीन पिके घेतात.या बंधाऱ्यामुळे आजही दुष्काळात सगळ्या विहिरी पाणीदार आहेत.तिथे फळबागा हिरव्यागार आहेत. शिरपूर शहराला दररोज ५ तास पाणीपुरवठा केला जातो.प्रत्येक घरात वॉटर मीटर बसवलेले आहे.

शिरपूर हा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेवर असलेल्या आदिवासीबहुल तालुक्यात ५ एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न ७-८ लाखांच्या घरात आहे. दरवर्षी १५ आदिवासी मुलांना अमरीश पटेल डॉक्टर बनवतात. आजपर्यंत त्यातून ८० आदिवासी मुले डॉक्टर झालीत. त्यांनी आपल्या मतदारसंघात मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल उभारलेले आहे.

अमरीश पटेल आपले स्वत:चे काही पैसे, त्यानंतर SVKM कडून ४-५ कोटी CSR फंड आणि त्यांच्या मुलीकडून ४-५ कोटी घेऊन हि बंधाऱ्यांची कामे करतात.ते स्वतः SVKM शिक्षण विषयात काम करणाऱ्या ट्रस्टचे अध्यक्ष आहेत

अमरीश पटेल यांच्या मते शेतकरी स्वत: या पॅटर्नमध्ये सहभागी होत नाहीत.त्यासाठी शेतकरी प्रोक्लेन आणि ट्रॅक्टरच्या वापरासाठी आग्रही असतात.लोकसहभागाच्या चळवळी जलसंधारणात टिकाऊ काम आजपर्यंत का करू शकल्या नाहीत याची हि स्पष्टोक्ती आहे.

महाराष्ट्र सरकारने याच आधारावर जलयुक्त शिवार योजना आणली पण या योजनेचा अप्रोच गुत्तेदार केंद्रित असल्याने ती योजना आताच्या महाराष्ट्राच्या दुष्काळात कामाला आलेली नाही.कारण या दुष्काळात अजून तरी जलयुक्त शिवार योजनेतून पाणीदार झालेल्या गावांच्या केस स्टडीज बाहेर आल्या नाहीत. अधिकाऱ्यांच्या टक्केवारी खाण्यामुळेही आणि २०१४ नंतर चांगला पाऊस पडल्याने हि योजना संपुष्टात आली.

या जलयुक्त शिवारच्या कामाचे जेही फोटो येतात ते पावसाळ्यात पाऊस पडल्यानंतरचे येतात पण उन्हाळ्यात यातले किती पाणी टिकते किंवा त्या भागातील विहिरींना, बोअरवेल्सला किती पाणी असते?

मराठवाड्यातील इथूनमागच्या आमदारांनी आणि किमान मंत्री झालेल्या नेत्यांनी जरी त्यांचे तालुके जलमय केले असते तर दुष्काळाची अशी भीषणता हिवाळ्यातच अनुभवता आली नसती!

— Suhas Tagare

रायरी येथे माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात साजरा



भोर - रायरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न झाला यावेळी शाळेच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प रथ देऊन व रांगोळी काढून भव्य स्वागत करण्यात आले जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रायरी ता भोर येथे पुणे जिल्हा परिषदेच्या विशेष उपक्रमांतर्गत दिवाळी पाडव्या निमित्त जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक हरी महांगरे यांनी सर्वांची स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान माजी सरपंच सूर्यकांत किंद्रे होते.यावेळी उपसरपंच संदीप किंद्रे,तंटामुक्तीचे अध्यक्ष किसन किंद्रे,मुख्याध्यापक हरी महांगरे माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक रामचंद्र पवार गोरक्षनाथ डेरे,शंकर लक्ष्मण किंद्रे,नितीन किंद्रे विश्वनाथ किंद्रे विजय किंद्रे,युवराज साबळे,राहुल किंद्रे,मंगेश किंद्रे,अमोल किंद्रे व माजी विद्यार्थी उपस्थित होते यावेळी माजी सरपंच सूर्यकांत किंद्रे यांनी शाळेसाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी जिल्हा परिषदेच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमात शाळेच्या सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष किसन किंद्रे यांनी सांगितले हे समोर बसलेले सर्व आमच्या गावचे हिरे आहेत.त्यांनी गावाचे नाव उज्वल केले असून इतरांनी त्यांचा आदर्श घेऊन गावचे नाव पुढे न्यावे यावेळी गोरक्षनाथ डेरे.विश्वनाथ किंद्रे नितीन किंद्रे तेजस किंद्रे,युवराज साबळे यांनी मनोगत व्यक्त केले. मुंबई पोलीस दलात निवड झालेल्या तेजस किंद्रे तसेच मुंबई कारागृह पोलीस म्हणून निवड झालेल्या राहुल किंद्रे यांचा तसेच शाळेचे मुख्याध्यापक हरी महांगरे यांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड झाल्या बद्दल सत्कार करण्यात आला. माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक रामचंद्र पवार यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी भोर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुजाता देशमाने व शिक्षण विस्तार अधिकारी अंजना वाडकर, केंद्रप्रमुख श्री दोडमिसे यांचे मार्गदर्शन मिळाले.

— किरण सदाशिव आंबिके

मनोरंजन

हुंदका एक आईचा’ वेब सिरीजमधून सामाजिक प्रबोधनाचा प्रभावी संदेश; रामदास राऊत यांच्या कलाकृतीचे कौतुक!



‘हुंदका एक आईचा’ वेब सिरीजमधून सामाजिक प्रबोधनाचा प्रभावी संदेश; रामदास राऊत यांच्या कलाकृतीचे कौतुक!

पुणे प्रतिनिधी |13 नोव्हेंबर 2026

तृप्ती फिल्म प्रोडक्शन निर्मित ‘हुंदका एक आईचा’ या मराठी वेब सिरीजमधून लेखक, निर्माते व दिग्दर्शक श्री. रामदास राऊत यांनी मनोरंजनासोबतच प्रभावी सामाजिक प्रबोधन केले आहे.

या वेब सिरीजमध्ये बालहत्येला विरोध, मोबाईलचा वाढता अतिरेक, कोणावर किती विश्वास ठेवावा, नात्यांमधील समजूतदारपणा आणि कौटुंबिक संवाद यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर भाष्य करण्यात आले आहे.

कुटुंबातील प्रेम, वात्सल्य, एकता, मुलांचे योग्य संगोपन, गावाची सामाजिक जडणघडण आणि परस्पर सहकार्य यांचे महत्त्वही या कथानकातून प्रभावीपणे मांडण्यात आले आहे.


मनोरंजनातून समाजाला विचार करायला लावणारी ही एक कौतुकास्पद कलाकृती असून श्री. रामदास राऊत यांच्या सामाजिक बांधिलकीचे विशेष कौतुक होत आहे.

आईचा’ या वेब सिरीजला प्रेक्षकांनी नक्की पाहावे, लाईक व सबस्क्राईब करून मराठी कलाविश्वाला प्रोत्साहन द्यावे!

— Anil Mallav, पुणे

मनोरंजन

सिनेमा आणि नाट्यगृहाअभावी मुरबाडकर मनोरंजनापासून वंचित; प्रशासनाने दखल घेऊन तात्काळ उपाययोजना कराव्यात — रमेश देसले यांची मागणी



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

दिनांक १४/११/२०२६.

मुरबाड (प्रतिनिधी) | नीड २४ न्यूज महाराष्ट्र:

कल्याण शहरापासून अवघ्या ३० किलोमीटर अंतरावर असलेला आणि झपाट्याने विकसित होणारा मुरबाड तालुका आजही मनोरंजनाच्या मूलभूत सुविधांपासून कोसो दूर आहे. संपूर्ण तालुक्यात एकही सिनेमा गृह किंवा सुसज्ज नाट्यगृह उपलब्ध नसल्याने, येथील हजारो सिने आणि नाट्य रसिक मनोरंजनाचा आस्वाद घेण्यापासून वंचित राहत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करावी, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते रमेश देसले यांनी केली आहे.

कल्याण-ठाण्याची वारी करावी लागल्याने रसिकांमध्ये नाराजी

मुरबाड शहर आणि ग्रामीण भागाचा विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. शिक्षण, उद्योग आणि नोकरीच्या निमित्ताने तालुक्यातील लोकसंख्येत मोठी वाढ झाली आहे. मात्र, कुटुंबासह विरंगुळ्याचे दोन क्षण घालवण्यासाठी किंवा चांगला मराठी-हिंदी चित्रपट आणि नाटक पाहण्यासाठी मुरबाडमध्ये कोणतीही व्यवस्था नाही. परिणामी, येथील रसिकांना नाईलाजाने कल्याण, डोंबिवली किंवा ठाणे शहराची वाट धरावी लागते.

वेळ आणि पैशांचा अपव्यय

कल्याण किंवा ठाण्याला जाऊन चित्रपट किंवा नाटक पाहणे हे सर्वसामान्य नागरिकांसाठी खर्चिक आणि वेळखाऊ ठरत आहे. प्रवासाचा ताण आणि आर्थिक भुर्दंड यामुळे अनेक कलाप्रेमी इच्छा असूनही नाट्य-चित्रपट कलेचा आस्वाद घेऊ शकत नाहीत. याचा फटका स्थानिक सांस्कृतिक चळवळीलाही बसत असल्याचे चित्र आहे.

प्रशासनाने गांभीर्याने दखल घेण्याची गरज

"मुरबाड तालुक्यातील जनतेची ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. कल्याणसारख्या मोठ्या शहरापासून इतक्या जवळ असूनही मुरबाडमध्ये एकही नाट्यगृह किंवा सिनेमा गृह नसावे, ही खेदाची बाब आहे. प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी प्रेक्षकांची ही गरज ओळखून लवकरात लवकर यावर ठोस निर्णय घ्यावा," असे मत रमेश देसले यांनी व्यक्त केले आहे.

आता तरी प्रशासन या प्रलंबित मागणीची दखल घेऊन मुरबाडकरांना हक्काचे मनोरंजन केंद्र उपलब्ध करून देणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

— Kashinath Desale, ठाणे

पुण्याच्या भोरमध्ये दुष्काळात शेतकऱ्यांना मका बियाणे वाटप, पशुसंवर्धन सहायक आयुक्तांचे मार्गदर्शन



पुण्याच्या भोरमध्ये दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना हिरवा चारा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि पशुसंवर्धन विभागाने एकत्रित प्रयत्न सुरू केले.

या उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मका बियाणे वाटप करण्यात आले आणि मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये शेतकऱ्यांना दुष्काळावर मात करण्यास मदत करणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती दिली गेली.

उद्दिष्ट शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी दर्जेदार बियाणे उपलब्ध करून दुष्काळाच्या आव्हानांना तोंड देणे हे आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नात वाढ होईल.

या कार्यक्रमात शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाच्या चाऱ्याचे सकस करण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले आणि पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. किशोर मुळे यांनी विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

— किरण सदाशिव आंबिके

हे मात्र अती होतंय...



माजी उपमुख्यमंत्री विजय दादा उपोषण स्थळी तीन तास बसून असून पण अधिकारी फोन उचलत नाहीत

— Suhas Tagare

कृषि

मोठी बातमी: ग्रामस्थानी ठरवलं...AI DATA सेंटर नको... ठराव मान्य झाला..



मोठी बातमी: ग्रामस्थानी ठरवलं...AI DATA सेंटर नको... ठराव मान्य झाला..

— Suhas Tagare

नौकरी

पुणे पोलीस दलात मोठे फेरबदल! तीन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या तडकाफडकी बदल्या; महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांना नवे अधिकारी



पुणे पोलीस दलात मोठे फेरबदल! तीन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या तडकाफडकी बदल्या; महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांना नवे अधिकारी

पुणे : प्रतिनिधी | 13 नोव्हेंबर 2026

पुणे शहर पोलीस दलात प्रशासकीय कारणास्तव मोठे फेरबदल करण्यात आले असून, तीन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या तडकाफडकी बदल्या करण्यात आल्या आहेत. या बदल्यांमुळे पुणे शहर पोलीस दलातील काही महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांच्या प्रमुखपदांमध्येही बदल झाले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांकडे आता नव्या जबाबदाऱ्या सोपविण्यात येणार आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांची वाहतूक शाखेत बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी शशिकांत चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच, लष्कर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे यांची विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी मारुती खेडकर यांच्याकडे लष्कर पोलीस ठाण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

दरम्यान, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप पवार यांची खडक पोलीस ठाण्यात गुन्हे पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी समाधान पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रशासकीय फेरबदलांमुळे पुणे शहर पोलीस दलातील महत्त्वाच्या पदांवर नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली असून, संबंधित अधिकारी लवकरच आपल्या नव्या पदांचा कार्यभार स्वीकारणार आहेत.

या बदलांमुळे पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाच्या कामकाजात कोणते बदल होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

— Anil Mallav, पुणे

स्थानीय

युवा कार्यकर्ते प्रविण मारुती कोर यांची मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड



नीड २४ न्यूज महाराष्ट्र

मुरबाड विशेष वृत्त

दिनांक: १३/११/२०२६

प्रतिनिधी: जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले (ठाणे) सह तालुका प्रतिनिधी किशोर पवार (मुरबाड)

मुरबाड: मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्हाईस चेअरमनपदी युवा कार्यकर्ते श्री. प्रविण मारुती कोर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे मुरबाड तालुक्यातील शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

मुरबाडच्या राजकारणात आणि सहकार क्षेत्रात एक तरुण, अभ्यासू आणि शेतकरी हितासाठी सदैव झटणारा चेहरा म्हणून प्रविण कोर यांची ओळख आहे. बाजार समितीचे सभापती व संचालक मंडळाने त्यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब केले.

शेतकरी हितासाठी कटिबद्ध राहणार

निवडीनंतर बोलताना नवनिर्वाचित व्हाईस चेअरमन प्रविण मारुती कोर यांनी आपल्या पुढील कामाची दिशा स्पष्ट केली. ते म्हणाले की, "शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देणे, बाजार समितीचा सर्वांगीण विकास करणे आणि शेतकऱ्यांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे, यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन."

त्यांच्या या निवडीबद्दल मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार किसनजी कथोरे, बाजार समितीचे सभापती, संचालक मंडळ तसेच सर्वपक्षीय नेत्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल तालुक्यातून ठिकठिकाणी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

— Kashinath Desale, ठाणे

बजरंग बप्पा सोनवणे यांच्या भर सभेत युवकांनी घेतला माईक



बजरंग बप्पा सोनवणे यांच्या भर सभेत युवकांनी घेतला माईक

— Suhas Tagare

कृषि

निरा नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नासाठी रास्ता रोको आंदोलन!



निरा नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नासाठी रास्ता रोको आंदोलन!

इंदापूर व माळशिरस तालुक्यातील निरा नदीकाठच्या गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. नदीपात्र कोरडे पडल्याने पिण्याचे पाणी, शेतीचे सिंचन आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.या पार्श्वभूमीवर निरा नदीत तातडीने पाणी सोडावे व नदीवरील बंधारे भरून द्यावेत, या मागणीसाठी सराटी (ता. इंदापूर) येथे श्री संत तुकाराम महाराज राष्ट्रीय महामार्गावर आयोजित रास्ता रोको आंदोलन झाले.

नदीकाठच्या शेतकरी व नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन निरा नदीत पाणी सोडण्याबाबत योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी केली.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माढा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, मा. आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, आप्पासाहेब जगदाळे यांच्यासह विविध पदाधिकारी, मान्यवर, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

— Suhas Tagare

स्थानीय

स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हा नंदुरबार



स्वाभिमानी शेतकरी संघटना

जिल्हा नंदुरबार

जाहीर आभार व कृतज्ञता!

नमस्कार,

आज दिनांक १३/११/२०२६ रोजी बिलाडी, (त.सा) ता. शहादा, जि. नंदुरबार येथील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी शेतकरी चळवळीला आर्थिक बळ देण्यासाठी ₹१०,५००/- (दहा हजार पाचशे रुपये) इतकी आर्थिक मदत दिली.

संघर्षाला आपण दिलेले हे योगदान अत्यंत मोलाचे आहे. शेतकरी चळवळ ही केवळ एका व्यक्तीची किंवा संघटनेची नसून ती प्रत्येक शेतकऱ्याच्या सहभागातून उभी राहते, याची प्रचिती आपल्या सहकार्यातून आली आहे.

आपल्या या आर्थिक योगदानाबद्दल बिलाडी येथील सर्व ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने मनःपूर्वक आभार व धन्यवाद!

आपला विश्वास आणि सहकार्य हीच शेतकरी चळवळीची खरी ताकद आहे.

आपला संघर्ष, आपली चळवळ, आपला स्वाभिमान!

घनश्याम चौधरी

स्वाभिमानी शेतकरी संघटना

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष

— Ashok Patil

धर्म

भोर, पुणे येथे नीरा नदी घाटावर भक्तीपूर्ण वातावरणात महाआरती



पुण्याच्या भोर शहरातील श्री स्वामी समर्थ मठाने नीरा नदी घाटावर भक्तीमय व उत्साही वातावरणात महाआरती पार पाडली.

सायंकाळी घाटाची स्वच्छता करून रांगोळी व दिव्यांची आकर्षक सजावट केली, त्यानंतर वेदमंत्रांच्या जयघोषात नदीचे विधिवत पूजन व महाआरती सुरू झाली.

या धार्मिक उपक्रमात शहरातील अनेक स्वामी भक्त व नागरिकांची मोठी उपस्थिती दिसली; आरतीच्या वेळी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला, दिव्यांच्या प्रकाशामुळे नदीचे पाणी उजळून निघाले.

सण उत्सवाच्या निमित्ताने नदीचे पवित्रत्व जपणे व पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणे हा या आरतीचा मुख्य उद्देश होता.

— किरण सदाशिव आंबिके

स्थानीय

भोरमध्ये दिवाळीच्या पहाटे श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारकावर प्रकाशझोत



भोर शहराच्या प्रवेशद्वाराजवळ, निरा नदीच्या तीरावर स्थित श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक दिवाळीच्या पहाटे आकर्षक विद्युतरोषणाने उजळले. या प्रकाशाने स्मारकाचे ऐतिहासिक वारसा आणि शिवरायांच्या शौर्याची आठवण करून दिली. दिवाळीच्या पहाटेच्या सौंदर्यात हे स्मारक अधिकच खुलून दिसत होते.


भोरचे प्रतिनिधी किरण आंबिके यांनी या दृश्याचे छायाचित्र टिपले, ज्याने भोरची माती छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावलांनी सुंदर निसर्ग सौंदर्य व पुण्यवान बनवली. त्यांच्या फोटोमुळे या दिवाळीच्या दिव्य प्रकाशाचे महत्त्व स्पष्ट झाले.

शिवरायांच्या शौर्याची आणि ऐतिहासिक वारशाची आठवण झाली. स्मारकाच्या उजेडाने शहराला एक नवीन ऊर्जा आणि अभिमान दिला. भोरच्या या दिवाळीच्या कार्यक्रमाने स्थानिक संस्कृती आणि परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले.

— किरण सदाशिव आंबिके

स्थानीय

सोलापूर जिल्हा परिषदेसमोर पंचप्पा काळे दाम्पत्याने मनपुरम गोल्ड लोन फायनान्स व पोलीसांविरुद्ध सत्याग्रह



पंचप्पा काळे दाम्पत्याने सोलापूर जिल्हा परिषदेसमोर मनपुरम गोल्ड लोन फायनान्स व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध बेमुदत उपोषणाविरुद्ध सत्याग्रह केला. दाम्पत्याने त्यांच्या बेकायदेशीर अटक व अडवणुकीबद्दल तक्रार केली आणि त्वरित मुक्तीची मागणी केली.

सत्याग्रहात दाम्पत्यासोबत काही स्थानिक रहिवासीही सहभागी झाले. त्यांनी जिल्हा परिषदेतून थेट संवाद साधून मनपुरम गोल्ड लोन फायनान्सच्या कारवायांबद्दल आणि पोलीसांच्या कारवाईबद्दल स्पष्टीकरण मागितले.


पोलीस अधिकाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी उपस्थिती दर्शविली, परंतु दाम्पत्याने त्यांच्या कारवाईला अनुचित आणि बेमुदत मानले. दोन्ही पक्षांमध्ये तात्पुरती चर्चा झाली, परंतु कोणतेही ठोस निराकरण अद्याप मिळाले नाही.

या सत्याग्रहामुळे सोलापूर जिल्हा परिषदेसमोर थोडा वाहतूक अडथळा निर्माण झाला, परंतु स्थानिक प्रशासनाने रस्त्याची स्वच्छता व वाहतूक प्रवाह राखण्याचे निर्देश दिले. दाम्पत्याने पुढील कायदेशीर कारवाईचा विचार करत असल्याचेही कळविले.

— YALLAPPA RAGATE (PATIL), सोलापुर

स्थानीय

हिव गावातील विहरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर कचऱ्याचा साठा



हिव गावातील विहरीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर कचऱ्याचा साठा आढळला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंवर प्लास्टिक पिशव्या, कागदपत्रे व इतर विविध कचरा पसरलेला आहे, ज्यामुळे पादचारी चालणे कठीण झाले आहे.


या कचऱ्यामुळे परिसराची स्वच्छता बिघडली असून, पादचारी साठी अस्वस्थता निर्माण झाली आहे. कचऱ्याचा साठा पावसाच्या वेळी पाण्याचा प्रवाह अडवून पाण्याची साचवणूकही होऊ शकते, ज्यामुळे अतिरिक्त अडचणी निर्माण होऊ शकतात.

व्यक्त करीत आहेत आणि रस्त्याची त्वरित साफसफाई व कचरा व्यवस्थापनाची मागणी करत आहेत.

— Akash Bhaskar Sapat

कृषि

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली १६ नोव्हेंबरला सोलापुरात भव्य मोर्चा



ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली १६ नोव्हेंबरला सोलापुरात भव्य मोर्चा

सोलापूर : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा, त्यांच्या आर्थिक अडचणी दूर व्हाव्यात आणि ऊस दराबाबत होणारा अन्याय थांबवावा, या मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोर्चाची सुरुवात सकाळी ११ वाजता चार पुतळा, हुतात्मा चौक, सोलापूर येथून होणार आहे.

संघटनेने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिली उचल प्रतिटन ३,५०० रुपये मिळावी, तसेच ऊस गाळप हंगामात प्रतिटन १०० रुपये आणि साखरेच्या दरानुसार पुढील वर्षभरात ४५ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाल्यास प्रतिटन आणखी २०० रुपये देण्याची मागणी करण्यात आली आहे.

कोल्हापूर, कर्नाटक, सातारा आणि पुणे जिल्ह्यांच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या दरातील तफावतीचा मुद्दाही या आंदोलनातून उपस्थित करण्यात येणार आहे.

'ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळालाच पाहिजे,' अशी भूमिका घेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जिल्ह्यातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना या भव्य मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

आयोजक : स्वाभिमानी शेतकरी संघटना, सोलापूर जिल्हा.

— DOCTOR PINTU PAUL, सोलापुर

स्थानीय

नागपूरमध्ये दिवाळीच्या दिवशी शिक्षक दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू, परिसरात शोककळा



नागपूर शहरातील बेसा परिसरातील रेवतीनगरात दिवाळीच्या सणादरम्यान एक शिक्षक दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

सोनाली गणवीर असून दोघेही गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड परिसरात शिक्षक म्हणून कार्यरत होते. ऑगस्ट २०२६ मध्ये त्यांचा विवाह झाला होता आणि दिवाळीच्या सुटीनिमित्त हे दाम्पत्य नागपूर येथे आले असताना ही दुर्दैवी घटना घडल्याचे वृत्त आहे.

घटनेची माहिती मिळताच बेलतरोडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

शिक्षक दाम्पत्याच्या अशा दुर्दैवी मृत्यूमुळे शैक्षणिक क्षेत्रासह नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. तपास पूर्ण झाल्यानंतरच घटनेमागील सत्य समोर येणार आहे.

— DOCTOR PINTU PAUL, नागपुर

स्थानीय

सावरटोला: १९ वर्षीय मुस्कान मेघ्राम यांचा संशयास्पद मृत्यू, पोलिस तपास सुरू



सावरटोला परिसरात १९ वर्षीय मुस्कान दिलीप मेघ्राम यांचा ९ नोव्हेंबरच्या रात्री संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याचे आढळले आहे.

रात्री सुमारास मुस्कान आणि तिच्या ओळखीतील एका तरुणामध्ये मोबाईलवरून संभाषण सुरू झाले आणि काही कारणावरून वाद झाला. नंतर रात्री जेवणासाठी आलेल्या नातेवाइकांना घराचा दरवाजा बंद असल्याचे आढळले, आवाज देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने पाहणी करताना मुस्कान मृतावस्थेत आढळली.

घटनेची माहिती मिळताच मोरगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. पोलिस प्रेमप्रकरणातील वादाशी संबंध आहे का हे तपासत आहेत.

या संशयास्पद मृत्यूमुळे सावरटोला परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांकडून मृत्यूचे नेमके कारण शोधून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणण्याची मागणी करण्यात आली आहे.

पोलिसांच्या तपासानंतरच या घटनेचे स्पष्ट कारण समजेल आणि सत्य परिस्थिती जनतेसमोर येईल.

— DOCTOR PINTU PAUL

स्थानीय

छत्रपती संभाजीनगरमध्ये पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर हल्ला



छत्रपती संभाजीनगरमध्ये पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर हल्ला करण्यात आला.

हल्ल्याचे कारण अद्याप स्पष्ट नाही.

स्थानिक पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

या घटनेबद्दत अधिक माहिती लवकरच दिली जाईल.

— IMRAN BELIM